सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

दि. २८ मार्च, २०२३

### शुभेच्छा

वात्सल्य सामाजिक संस्था विविध सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असल्याचे समजून आनंद वाटला. संस्थेच्या विविध विधायक सामाजिक उपक्रमांना शुभेच्छा.

राज्याच्या सर्वांगीण विकासात विधायक, सक्रियपणे काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असते. गो-संवर्धन, आरोग्य, एकल भगिनी, वृक्ष लागवड व संवर्धन, अनाथ मुलांसाठी शैक्षणिक कार्य अशा विविध क्षेत्रात संस्था कार्यरत आहे हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

समाजातील विधवा, परित्यक्ता, अनाथ, एकल महिलांसाठी कोरोनाच्या संकट काळात महिलांनी महिलांसाठी सुरू केलेली ही संस्था वैशिष्ट्यपूर्ण कामांमुळे आपले वेगळेपण निर्माण करत आहे. संस्थेमार्फत अनेक उपक्रम राबविले जातात हे प्रेरणादायी आहे. एकल महिलांचे प्रश्न, जगण्यासाठी करावी लागणारी धडपड, स्वाभिमानी जीवन जगण्याचे मार्ग, अशा मूलभूत प्रश्नावर तुळजापूर आणि परिसरातील महिलांमध्ये संस्थेचे कार्य आहे. या भगिनींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिलाई मशीन, कुक्कुटपालन, गांडूळ खत प्रकल्प, शेळीपालन, अशा गोष्टींची मदत केली जाते. या कामांमुळे संस्था निराधारांसाठीचा सक्षम आधार ठरली आहे.

संस्थेचे सामाजिक क्षेत्रातील विधायक कार्य यापुढेही असेच सक्रियपणे व अविरतपणे सुरू राहील अशी आशा बाळगतो. संस्थेच्या विविध विधायक कार्यक्रम आणि उपक्रमासाठी शुभेच्छा.

(देवेंद्र फडणवीस)